# सहसंचालक तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, मुंबई

जागतिक बँक प्रकल्पांतर्गत इमारत, पहिला मजला, शासकीय तंत्रनिकेतन परिसर ,
४९, खेरवाडी, अलियावार जंग मार्ग, वांद्रे(पूर्व) ,मुंबई ५१.
फोन नं.२६४७ ४८९२ टेलीफॅक्स नं.२६४७ १६१९
ई-मेल- jtdirrom@gmail.com website – www.jdteromumbai.com

परिपत्रक

क्र. २/विकामुं/तंशि/इबीसी/२०१५/2007
दिनांक : 1 1 JUL 2015

प्रति,
संचालक /प्राचार्य
खाजगी विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित
अभियांत्रिकी पदवी /औषधनिर्माणशास्त्र पदवी महाविद्यालये.

विषय : खाजगी विनाअनुदानीत व कायम विनाअनुदानीत शिक्षण संस्थेमध्ये व्यावसायिक अभ्यासक्रमास प्रवेश घेतलेल्या आर्थिकदृष्टया मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या वर्ष २०१४-१५ साठी शैक्षणिक शुल्काच्या प्रतिपूर्तीबाबत...................

संदर्भ : १. मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा., मुंबई यांचे पत्र क्र. १५/तंशिसं/अर्थसं/ईबीसी/ऑनलाईन/२००१४-१५/२३, दि. ०८/०६/२०१५
२. या कार्यालयाचे परिपत्रक क्र. २/विकामुं/तंशि/इबीसी/२०१५/१७२६, दि. ११/०६/२०१५

सर्व खाजगी विनाअनुदानीत व कायम विनाअनुदानीत पदव्युत्तर पदवी, पदवी, पदविका संस्थांना कळविण्यांत येते की, शैक्षणिक वर्ष २०१४-१५ मध्ये प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना आर्थिकदृष्टया मागास प्रवर्गातील तसेच यापूर्वी अर्ज भरु न शकलेल्या अशा सर्व विद्यार्थ्यांना (एन.एफ.आर. संस्थेतील विद्यार्थ्यांसहीत) संगणकीय प्रणालीवर दि. ०८/०६/२०१५ ते ३०/०६/२०१५ पर्यंत अर्ज भरण्यासाठी लिंक देण्यांत आली होती. अशाप्रकारे ज्या संस्थांतील विद्यार्थ्यांनी अर्ज भरले नव्हते परंतु वरील कालावधीत ज्या विद्यार्थ्यांनी अर्ज भरुन संस्थांकडे सादर केलेले आहेत. अशा संस्थांनी सदर विद्यार्थ्यांचे अर्ज विहीत प्रमाणपत्र व हमीपत्र तसेच विद्यार्थ्यांच्या घोषणापत्रासहीत **दि. १५/०७/२०१५ किंवा त्यापूर्वी या कार्यालयाकडे सादर करावेत**. अपूर्ण व चुकीचे कागदपत्रे जोडून सादर केलेले अर्ज कोणतीही पूर्वसूचना न देता नामंजूर करण्यांत येणार आहेत. त्यामुळे संस्थांनी मार्गदर्शक सुचनांमध्ये दिलेल्या सुचनांप्रमाणे अचूक व योग्य अर्जच या कार्यालयाकडे सादर करावेत.

तसेच असे निदर्शनास आले आहे की, काही संस्था विद्यार्थ्यांनी उशिराने आधारकार्ड लिंक करुन दिलेले अर्ज स्विकारीत नाहीत. परिणामी असे विद्यार्थी या कार्यालयाकडे येऊन त्यांचे अर्ज संस्था स्विकारीत नाहीत. आता आम्ही काय करायचे ? अशी विचारणा करीत आहेत. या परिपत्रकाद्वारे कळविण्यांत येते की, शासनाने कळविल्यानुसार विद्यार्थ्यांनी त्यांचे बचत खाते आधार कार्डाशी लिंक करणे अनिवार्य आहे. परंतु अद्यापही काही विद्यार्थ्यांचे आधार कार्ड काही तांत्रिक तथा विद्यार्थ्यांच्या वैयक्तिक अडचणीमुळे लिंक करावयाचे राहीले आहेत. तरी सर्व संस्थांनी विद्यार्थी त्यांचे लिंक केलेले फॉर्म्स जसजसे आधरकार्ड लिंक करुन सादर करतील. त्याअन्वये स्विकारावेत व त्याची यादी या कार्यालयाकडे सादर करावी.

(प्रमोद अं. नाईक)
सहसंचालक
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, मुंबई